# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दि. ३१/०१/२०१८

## साईनाथच्या मावस भावाचा माओवादयाकडून खुन

आज रोजी उपविभाग हेडरी अंतर्गत येणाऱ्या पोमके येमलीबुर्गी हद्दीत दिनांक ३१/०१/२०१८ रोजी दुपारी ०२.३० ते ०३.०० वा. सुमारास भरलेल्या कोंबडाबाजारात साध्या वेषातील ३ ते ५ माओवादयांनी इरफा उसेंडी, वय-३० वर्षे, रा. अबनपल्ली, ता. एटापल्ली याची गोळया घालून खुन केला.

सुरजागड पहाडीवर गेल्या वर्षी मोठया प्रमाणात गाडयांची जाळपोळ करण्यात आली होती यामध्ये त्याचा सहभाग होता त्याचेवर पोस्टे एटापल्ली येथे अप. क्रं. ३५/२०१६ भा.द.वि. कलम ३०७, ३४१, ३४२, ४३५, ३२३, ५०४, ५०६, १४७, १४८, १४९, १२० (ब) भारतीय शस्त्र कलम ५/२८, UAPA act १६, १८, २०, २३ मुं.पो.का. कलम १३७ अन्वये दाखल असून त्याला पोलीसांनी १४ फेब्रुवारी २०१७ ला या गुन्हयात अटक केली होती. दिनांक २७/०३/२०१७ रोजी त्याची जामीनावर सुटका झाली होती. इरफा उसेंडी हा माओवादयांच्या पेरमीली दलम कमांडर साईनाथ उर्फ दोलेश आत्राम रा. गट्टेपल्ली ता. एटापल्ली जि. गडचिरोली याचा मावस भाऊ असून हा खुन कोणत्या कारणावरुन करण्यात आली याचा तपास चालु आहे.